## पुणे



# पैसे उकळणाऱ्या मालकीहक्क परवाना एजन्सीवर कारवाई

**पुणे** : बंडगार्डन येथील एका हॉटेलमधील लग्न समारंभात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात मालकी हक्क परवाना (कॉपीराईट) देण्याच्या बहाण्याने पीपीएल व नोव्हेक्स कम्युनिकेशन या मुंबईतील दोन कंपन्यांनी पुण्यातील व्यावसायिकाकडून १ लाख ३७ हजार रूपये उकळले होते. याप्रकरणी पीपीएलमधील कर्मचाऱ्यांना अटक केली असून, नोव्हेक्स कम्युनिकेशनचे अधिकारी अद्याप फरार आहेत.

दरम्यान, फोनोग्राफिक परफॉर्मन्स लिमिटेडच्या (पीपीएल) अधिकाऱ्यांना अटक केल्याबद्दल हॉटेल आणि रेस्टॉरंट्स इंडस्ट्रीची सर्वोच्च असलेल्या फेडरेशन ऑफ हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ इंडियाने (एफएचआरएआय) पुणे पोलिसांचे कौतुक केले आहे.

पीपीएल आणि नोव्हेक्स कम्युनिकेशनच्या विरोधात कोरेगाव पोलिस ठाण्यात पुण्यातील संबंधित व्यावसायिकाने फिर्याद दिली होती. आरोपींनी १ लाख ३७ हजार रूपये उकळल्यानंतर, ना हरकत प्रमाणपत्रावर विवाह समारंभाचा उल्लेख न करता डीजे पार्टी आणि 'गेट टुगेदर पार्टी' अंतर्गत परवाना जारी केला, असे फिर्यादीत नमूद आहे. या गुन्ह्याप्रकरणी पीपीएलमधील आरोपी कर्मचाऱ्यांना अटक करण्यात आली आहे. तर नोव्हेक्स कम्युनिकेशनचे अधिकारी अद्याप फरार आहेत. एफएचआरएआयने पुणे पोलिस आयुक्तांना नोव्हेक्स कम्युनिकेशनवरही अशीच कारवाई करण्याची विनंती केली आहे. पुणे सत्र न्यायालयाने पीपीएलमधील आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळून लावला होता.